# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सुगत नगर येथील सुलभ शौचालयाचे
**{स्लम विभाग}** नुतनिकरण करण्यास्तव तयार करण्यात आलेल्या रू. २५७६६५५/- (पंचवीस लक्ष छयात्तर हजार सहाशे पंचावन फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न विचारात घेणे. सदर काम मनपाचे आय व्यय पद क्र. A४४५०१३७२३०५ अंतर्गत करण्यात येईल.

टिप : -

१. बांधकामाचा पद क्र. A४४५०१३७२३०५ अंतर्गत करण्यात येईल.
२. या कामाचे रू. २१६०२५३/- रकमेचे प्राकलनास अधिक्षक अभियंता यांनी तांत्रीक मान्यता दिलेली आहे.
३. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 144/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 10/11/2022**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, स्लम विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सुगत नगर येथील सुलभ शौचालयाचे नुतनिकरण करण्यास्तव तयार करण्यात आलेल्या रू. २५७६६५५/- (पंचवीस लक्ष छयात्तर हजार सहाशे पंचावन फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. (सदर काम मनपाचे आय व्यय पद क्र. A४४५०१३७२३०५ अंतर्गत करण्यात येईल.)

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**